# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### बृहन्मुंबईत २००० नंतरच्या झोपड्यामध्ये वास्तव्य करणाऱ्या नागरिकांना १५ वर्षाच्या भाडेपट्ट्याने घरे देण्याबाबत

**(१) ६४२८ (७-५-२०१५) : श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबईत २००० नंतरच्या झोपड्यामध्ये वास्तव्य करणा-या नागरिकांना १५ वर्षाच्या भाडेपट्ट्याने घरे देण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१५ च्या तिसऱ्या आठवडयात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. प्रकाश महेता (०१-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारण, निर्मुलन व पुनर्विकास), १९७१ मधील तरतूदीनुसार पात्र झोपडपट्टीधारकांना त्यांच्या भोगवटयाखालील जमिनीचा भाडेपट्टा मिळण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण विभागाच्या दि.१०.७.२००२ च्या शासन निर्णयामध्ये दि.१६.७.२०१६ व ३.१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत. मात्र, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अस्तित्वात असलेल्या शहारांना (मुंबई, ठाणे, पुणे व पिंपरी-चिंचवड) सदर तरतुदी लागू नाहीत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईतील शहरातील जुन्या बी.डी.डी. चाळींच्या दुरुस्तीसाठीच्या निधीबाबत

**(२) ११४०५ (७-५-२०१५) : श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शहरातील जुन्या बी.डी.डी. चाळींच्या दुरुस्तीसाठीचा निधी म्हाडाने न वापरता तो एक वर्षानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे परत पाठविल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा निधी बी.डी.डी.च्या दुरुस्तीकरिता न वापरण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, बी.डी.डी.चाळीची दुरुस्ती म्हाडा करीत नसतानाही सदर निधी का स्विकारण्यात आला,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०२-२०१९) :** (१), (२) व (३) सन २००९-१० या आर्थिक वर्षात मुंबई व मुंबई उपनगर जिल्हयातील झोपडीपट्टीवासियांना विविध पायभूत सुविधा पुरविण्यासाठी शासन निर्णय, दि.३०.७.२००९ अन्वये रु.९० कोटी निधी म्हाडा प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्यात आला होता. सदर निधीपैकी बी.डी.डी. चाळीच्या देखभाल व दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उपलब्ध होणारा नाधी कमी पडत असल्याने अत्यंत तातडीची देखभाल व दुरुस्तीची कामे हाती घेणे आवश्यक असल्याने शासन पत्र, दि.४.३.२०१४ अन्वये रु.१०.०० इतका निधी म्हाडा प्राधिकरणास उपलब्ध करून देण्यात आला होता. म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने दि.५.५.२०१५ अन्वये सदर निधीचा विनियोग करण्यात आला नसल्याने अखर्चित निधी सार्वजनिक बांधकाम विभागास वर्ग करण्याबाबत कळविले.

वित्त विभाग, शासन निर्णय, रि.२५.८.२०१५ अन्वये वितरित केलेल्या अनुदानापैकी अखर्चित निधीबाबतची कार्यप्रणाली निर्गमित करण्यात आली आहे. त्यानुसार जी कामे सुरु नाहीत त्याचा निधी तात्काळ शासनास जमा करण्याबाबत दिलेल्या सुचनेनुसार सदर अखर्चित निधी शासनास जमा करण्याबाबत शासन मान्यतेने म्हाडा प्राधिकरणास कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील झोपडपट्टयांमधील विकासकामे करण्याबाबत**

**(३) १८१६५ (१६-९-२०१५) : श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील झोपडपट्टयांमध्ये सन २०१४-२०१५ या वर्षासाठी रु.४५ कोटींची विकास कामे करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील कोणकोणत्या भागातील झोपडपट्टयांचा समावेश या योजनेत करण्यांत येणार आहे, तसेच विकास कामांमध्ये कोणकोणत्या कामाचा समावेश करण्यात आला आहे.

(३) असल्यास, आतापर्यंत कोणकोणत्या झोपडपट्टीचे विकास आराखडे व नकाशे तयार करण्यात आले आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०२-२०१९) :** (१), (२) व (३) मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांच्या अहवालानुसार, शासन निर्णय, दि.३१.३.२०१५ अन्वये सन २०१४-१५ या वर्षाकरिता रु.४५ कोटी निधी मंजूर करण्यात आला होता. सदर आदेश वर्षाअखेर निर्गमित झाल्याने प्रत्यक्ष निधी त्या आर्थिक वर्षात म्हाडाकडे जमा न झाल्याने जुलै, २०१५ च्या अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीद्वारे सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात उपलब्ध झालेल्या रु.४५ कोटी निधीपैकी ७० टक्के रक्कम म्हणजेच रु.३१.५० कोटी इतका निधी म्हाडा प्राधिकरणास वितरित करण्यात आला आहे.

सन २०१४-१५ मध्ये एकुण रु.१२६.०० कोटी निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी रु.११२.५० कोटी इतका निधी म्हाडास वितरित करण्यात आला आहे. म्हाडा प्राधिकरणास वितरित करण्यात आलेल्या एकुण रु.११२.५० कोटी पैकी रु.१०९.२४ कोटी खर्च झाला आहे. मुंबई व मुंबई उपनगर क्षेत्रात विशेषत्वाने झोपडपट्ट्यांचा समावेश सदर योजनेत करण्यात आला आहे. सदर योजनेत विशेषत्वाने मुंबई व मुंबई उपनगर क्षेत्रातील झोपडपट्टी भागात मुलभूत व पायाभूत नागरी सुविधा पुरविण्याच्या कामांचा (उदा. अंतर्गत रस्ते, पायवाटा, पाण्याचे नळ, दिवाबत्ती, सार्वजनिक शौचालय, गटारे इ.) समावेश करण्यात आलेला आहे. म्हाडाच्या सुधार मंडळामार्फत मुलभूत व पायाभूत सुविधांच्या कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील वरळी कोळीवाड्यातील सुमारे साडेचार एकर परिसर झोपडपट्टी क्षेत्र घोषीत केल्याबाबत

**(४) ४४०२१ (०२-०६-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी कोळीवाड्यातील सुमारे साडेचार एकर परिसर झोपडपट्टी क्षेत्र घोषीत करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने वरळी कोळीवाडयाबाबतचा शिफारस अहवाल दफ्तरी दाखल करुन वरळी कोळीवाडयातील पारंपारीक मच्छीमार, स्थानिक भूमिपुत्र यांना विश्वासात घेवून वरळी कोळीवाडयाचा विकास करण्यासाठी तातडीने सर्वसमावेशक धोरण आखण्याचे आदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्याची विनंती मा. मुख्यमंत्री महोदयांना लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील कोळीवाडयामधील घरांच्या पुनर्विकासाबाबत विकास नियंत्रण नियमावलीत काहीही तरतूद नसून मुंबई शहर व उपनगराच्या नव्या विकास आराखडयातही कोळीवाडयांची दखल घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी झोपडपट्टीतील कोळी समाजाशी संबंधित विविध संघटनांनी विरोध केल्याने शासनाने हा निर्णय मागे घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात विरोध करणाऱ्या झोपडपट्टीधारकांनी व विविध संघटनांनी कोणकोणत्या मागण्या केल्या आहेत व त्यांच्या मागण्यासंदर्भात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) नगर विकास विभाग, शासन अधिसुचना दि.८.०५.२०१८ द्वारे बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली-२०३४ शासनाने मंजूरी दिली असून सदर नियमावलीतील विनियम ३३(१६) मध्ये गावठाण/कोळीवाडा/आदिवासी पाडा क्षेत्राच्या पुनर्विकासासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. गावठाण/कोळीवाडा/आदिवासी पाडा क्षेत्राच्या सीमा/हद्दी महसूल विभागाने निश्चित करावयाच्या असून महसूल विभागाने अशा हद्दी निश्चित केल्यानंतर सदर क्षेत्रासाठी स्वतंत्र विनियम करण्याचे संकल्पित आहे.
(४) सदर प्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने सुनावणी घेवून प्रकरण दप्तरीदाखल केलेले आहे.
(५) सिमांकन व विशेष विकास सवलती संदर्भात मागण्या असून याबाबत महसूल व वन विभाग तसेच नगर विकास विभागाकडे कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात इमारत बांधकामाबाबत परवानगीसाठी एक खिड़की योजना सुरु करणेबाबत

**(५) ५०५१९ (२०-५-२०१६) : श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात इमारत बांधकामासाठी परवानगी देण्यासाठी विविध ११९ परवानग्या घ्याव्या लागत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इमारत बांधकामासाठी आवश्यक परवानग्यांची संख्या कमी करून एक खिडकी योजना सुरु करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इमारत बांधकामासाठी आवश्यक परवानग्यांची संख्या कमी करून एक खिडकी योजना सुरु करण्यासाठी शासन विचाराधीन आहे काय,
(४) असल्यास, इमारत बांधकामासाठी आवश्यक परवानग्यांची संख्या कमी करून एक खिडकी योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०२-२०१९) :** (१ ते ४) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदीनुसार प्रादेशिक योजना क्षेत्रात कलम १८ नुसार जिल्हाधिकारी तर विकास योजना क्षेत्रात कलम ४५ नुसार नियोजन प्राधिकरणाचे आयुक्त/मुख्याधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विकास परवानगी मंजुर करणेचे अधिकार आहेत. यानुषंगाने आवश्यक कागदपत्रांबाबत संबंधित विकास नियंत्रण नियमावलीत नमूद केलेले आहे.

राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदा व संबंधित नियोजन प्राधिकरणे यांचेकडील इमारतींच्या बांधकामासाठी लागणाऱ्या विविध परवानगी प्रकरणात सुसुत्रता आणण्याच्या दृष्टीकोनातुन शासनस्तरावर एक संगणकीय आज्ञावली (portal) व या प्रयोजनासाठी Building Plan Management System तयार करणेचा निर्णय शासनाने घेवुन या संदर्भात दि.१६/३/२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. या प्रणालीचा वापर करुन राज्यातील नगरपरिषदांच्या क्षेत्रातील तसेच "ड" वर्ग महानगरपालिकांच्या क्षेत्रातील बांधकाम परवानगी व अनुषंगीक कामकाज ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्यात आले आहे. या पध्दतीमध्ये नागरीकांनी वास्तुविशारद / ला.इंजिनिअर यांचेमार्फत ऑनलाईन अर्ज केल्यानंतर स्थानिक प्राधिकरणाच्या स्तरावरील आवश्यक नाहरकत दाखले या प्रणालीद्वारे उपलब्ध करुन घेण्यात येत असल्याने आवश्यक परवानग्यांची / दाखल्यांची संख्या कमी झालेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रिअल इस्टेट कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नियम तयार करतांना शासनाने विकासकांना अनुकूल अशा ५२ तरतूदींचा नियमात समावेश केल्याबाबत

**(६) ७४११९ (२०-०४-२०१७) श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विकासकांवर वचक आणून ग्राहकांना आपले हक्क देऊ करणा-या केंद्रीय रिअल इस्टेट कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नियम तयार करतांना शासनाने विकासकांना अनुकूल अशा ५२ तरतूदींचा नियमात समावेश केल्याची धक्कादायक बाब मुंबई ग्राहक पंचायतीने हरकती व सूचनाव्दारे शासनाच्या निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियम तयार करतांना तरतूदी तशाच ठेवल्या तर त्याचा फायदा विकासकांना मिळणार असल्याने या चूका तातडीने दुरुस्त कराव्यात अशी मागणी ग्राहक पंचायत समितीने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (३१-०१-२०१९) :** (१) व (२) एकूण ५२ तरतूदीसंदर्भात मुंबई ग्राहक पंचायतीने हरकत नोंदविली होती, ही बाब खरी आहे.
(३) उपरोक्त विषयाबाबत प्राप्त झालेल्या सर्वच हरकती /सूचना विचारात घेऊन, विधी व न्याय विभागाच्या सहमतीने पूर्ण विचाराअंती शासनाने एकूण ५ नियम अधिसूचित केले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेरा कायद्याच्या अंमलबजावणीबाबत**

**(७) ७५२५५ (२१-०४-२०१७) श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने संमत केलेल्या बांधकाम नियमन आणि विकास अधिनियमात (रेरा) शासनाने तयार केलेल्या शासन विकास व नियमावलीत सदनिका आरक्षणाचे ४५ टक्के शुल्क, सदनिकेचे हप्ते भरण्यास विलंब झाल्यास सात दिवसाची ई-मेलद्वारे नोटीस देवून करार रद्द करणे आदी अनेक विकासक धार्जिण्या तरतुदी करून शासनाने ग्राहक जनतेवर अन्याय केल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी रेरा कायदयाच्या मुलभूत हेतूशी तडजोड करण्याचा अधिकार कोणालाही नाही तसे शासन करू शकत नाही व तसे केल्यास जन आंदोलन उसळण्याचा इशारा केंद्रीय गृहनिर्माण व शहर विकास मंत्री महोदयांनी दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनाला दिला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्रीय मंत्र्यांचे निर्देशानुसार मुळ रेरा कायदयाची आहे तशी संपूर्णः अंमलबजावणी करण्याबाबत अद्याप शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?
**श्री. प्रकाश महेता (०२-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ हा संपूर्ण राज्यामध्ये दि. ०१.०५.२०१७ पासून लागू करण्यात आला असून उपरोक्त अधिनियमातील तरतुदींनुसार खालील ५ प्रकारचे नियम अधिसूचित करण्यात आले आहेत:-

(अ) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण अधिकारी व कर्मचारी (नियुक्ती व इतर सेवाशर्ती)नियम, २०१७, १७.०४.२०१७

(ब) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (वार्षिक लेखा विवरणपत्राचे नमुने व वार्षिक अहवाल) नियम, २०१७, १८.०४.२०१७

(क) महाराष्ट्र स्थावर संपदा (विनियमन व विकास) (व्याज शास्ती, नुकसानभरपाई व देय दंड यांची वसूली तक्रारी व अपील इत्यादी नमूने नियम, २०१७, १९.०४.२०१७

(ड) महाराष्ट्र स्थावर संपदा अपील न्यायाधिकरण अधिकारी व कर्मचारी (नियुक्ती व इतर सेवाशर्ती) नियम, २०१७, २०.०४.२०१७

(इ) महाराष्ट्र स्थावर संपदा (विनियमन व विकास) (स्थावर संपदा प्रकल्पांची नोंदणी, स्थावर संपदा अभिकर्त्याची नोंदणी, व्याजदर आणि संकेत स्थळावर त्याचे प्रकटन) नियम, २०१७, २१.०४.२०१७

तसेच, उपरोक्त अधिसूचनेतील (ड) मध्ये खालील अधिसूचनेन्वये सुधारणा करण्यात करण्यात आलेल्या आहेत:-

(क) महाराष्ट्र स्थावर संपदा अपील न्यायाधिकरण अधिकारी व कर्मचारी (नियुक्ती व इतर सेवाशर्ती) नियम, २०१८, २९.११.२०१८

(ख) महाराष्ट्र स्थावर संपदा अपील न्यायाधिकरण अधिकारी व कर्मचारी (नियुक्ती व इतर सेवाशर्ती) (दुसरी सुधारणा) नियम, २०१८, दि. २३.०१.२०१९

---

## मुंबईतील बांधकाम व्यवसायातील गैरप्रकारांना आळा घालण्याबरोबरच घर खरेदीदारांच्या हिताचे रक्षण करण्याबाबत

**(८) ८४७३७ (२१-०४-२०१७) ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बांधकाम व्यवसायातील गैरप्रकारांना आळा घालण्याबरोबरच घर खरेदीदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी राज्यात विविध प्रकारे कायदे असले तरी या कायद्यांना न जुमानता गत काही वर्षात विकासकांनी घर खरेदीदारांच्या केलेल्या फसवणूकीची एकूण १६ हजार प्रकरणे प्रलंबित असल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकांकडून फसवणूकीच्या १६ हजार प्रकरणे प्रलंबित असल्याप्रकरणी शासनाने तातडीने निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करुन विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश महेता (०२-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

दि.०८.०३.२०१७ रोजी महारेरा प्राधिकरणाची स्थापना झाल्यानंतर दि. ३१.०८.२०१८ रोजीपर्यंत एकूण ४०१४ तक्रारी प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) महारेरा प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या तक्रारींबाबत नियमानुसार कारवाई करण्यात येत असुन जानेवारी २०१९ अखेरच्या सद्यस्थितीनुसार महारेरा प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या एकूण ५६२३ तक्रारींपैकी ३४५९ तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत.

---

**लातूर, परभणी, चंद्रपूर महानगरपालिकेचे सहाय्यक अनुदान शासनाने बंद केल्याबाबत**

**(९) ८६११९ (२३-०८-२०१७) श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर, परभणी, चंद्रपूर महानगरपालिकेचे सहाय्यक अनुदान शासनाने बंद केल्याने महानगरपालिकेसमोर अनेक समस्या उभा टाकल्या असून कर्मचाऱ्यांचे चार-चार महिन्यांचे पगार थकले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महापालिकांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी शासन मदत करणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०२-२०१९) :** (१) अनुज्ञेय कालावधीनंतर सहायक अनुदान न मिळाल्याने कर्मचाऱ्यांचे पगार थकल्याची बाब खरी नाही.

(२)

- शासन निर्णय दि.२५.०८.२०१४ नुसार लातूर, परभणी, चंद्रपूर या महानगरपालिका व यापुढे नव्याने निर्माण होणाऱ्या महानगरपालिकांना त्या “अ” वर्ग नगरपरिषदा आहेत असे समजून महानगरपालिका निर्माण झाल्यापासून पुढील सलग पाच वर्षे निर्मितीनंतर प्रतिवर्षी १० टक्के वाढीसह १०० टक्के सहायक अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.
- तदनुसार संबंधित महानगरपालिकांना दि.०१.११.२०१२ ते दि.३१.१०.२०१७ या कालावधीसाठीचे सहायक अनुदान वितरीतही करण्यात आले आहे.
- महानगरपालिकांनी त्यांचा आस्थापना खर्च महानगरपालिकेच्या स्वउत्पन्नातून भागविणे अभिप्रेत आहे.
- शासनामार्फत महानगरपालिकांना विविध विकास योजनांसाठी वेळोवेळी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंधेरी (प) येथील म्हाडाच्या निधीतून बांधण्यात आलेले बालवाडी, योगाकेंद्र, समाजकल्याण केंद्र पार्ले रेसीडेंट असोसिएशन या संस्थेच्या ताब्यातून सोडविण्याबाबत**

**(१०) ९१३८४ (०१-०९-२०१७) श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (प) (मुंबई) नेहरु नगर येथील अण्णा चाळीतील बालवाडी, जुहू वर्सोवा लिंक रोड येथील योगा केंद्र, जेव्हीपीडी १३ वा रोडवरील समाजकल्याण केंद्र, वायरलेस रोडवरील बालवाडी म्हाडाच्या निधीतून बांधण्यात आले असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बालवाडी, योगाकेंद्र, समाजकल्याण केद्र, या जागा विलेपार्ले रेसीडेंट असोसिएशन या संस्थेने सन २००९ या कालावधी पासून ताब्यात घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थांबरोबर म्हाडाचा किंवा मुंबई स्लम बोर्डाचा कुठल्याही प्रकारचा करार झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर बालवाडी, योगा केंद्र, समाजकल्याण केंद्र सदर संस्थेच्या ताब्यातून सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश महेता (०१-०२-२०१९) :** (१) मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांच्या अहवालानुसार, अंधेरी (प) (मुंबई) नेहरु नगर येथील अण्णा चाळमधील बालवाडी, जुहू वर्सोवा लिंक रोड येथील योगा केंद्र, जेव्हीपीडी १३ व्या रोडवरील समाजकल्याण केंद्र जिल्हा नियोजन समितीने उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून म्हाडाच्या मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत बांधण्यात आले आहे. तर, वायरलेस रोडवरील बालवाडी माजी संसद सदस्य यांच्या विकास निधीतून सन १९९५-९६ साली मुंबई महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) जुहू वर्सोवा लिंक रोड येथील योगा केंद्राचा देखभाल करारनामा विलेपार्ले रेसिडेन्टस वेल्फेअर असोसिएशन या संस्थेबरोबर सन २०१३ मध्ये सुधार मंडळामार्फत करण्यात आलेला आहे. सदर संस्थेने मुदतवाढीची मागणी केली असून नेहरु नगर येथील अण्णा चाळीमधील बालवाडी, जोव्हीपीडी १३ वा रोड वरील समाज कल्याण केंद्राचे देखभाल करारनामा झाल्याचे दिसून येत नाही.
(४) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांनी सदर वास्तुचा ताबा घेण्याबाबत कळविल्यानुसार जुहू लोटस आय हॉस्पिटल जवळील समाजकल्याण केंद्राचा ताबा तसेच जुहू वर्सोवा लिंक रोड वरील कपासवाडी जवळच्या योगा केंद्राचा ताबा दि.१६.१.२०१८ रोजी म्हाडाच्या मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत घेण्यात आला आहे. तसेच, नेहरु नगर आण्णाचाळ येथील समाजकल्याण केंद्रामध्ये लहान मुलांचे बालवाडी वर्ग सुरु असल्याने सदर केंद्राचा ताबा घेण्यात आला नसल्याचे मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील तालुकास्तरीय ग्रामपंचायतीना नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबत

**(११) १०१४३३ (२६-१२-२०१७) श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सुमारे ३५० तालुका स्तरावरील ग्रामपंचायतींना नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबतचे सन २०१४ मध्ये सर्व्हेक्षण होऊन हरकती मागवून सविस्तर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर अद्यापही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार राज्यातील तालुकास्तरीय ग्रामपंचायतींना नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३)

- राज्यातील तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी असणाऱ्या १३८ ग्रामपंचायतींचे नगरपरिषद/नगरपंचायतीमध्ये रूपांतर करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला.
- दि. ०१.०३.२०१४ रोजी १३६ ग्रामपंचायतींचे नगरपरिषद / नगरपंचायतींमध्ये रूपांतर करण्याबाबत प्राथमिक उद्घोषणा करण्यात आली.
- तद्नुसार, अद्यापपर्यंत तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी असणाऱ्या १२३ ग्रामपंचायतींचे रूपांतर नगरपरिषद/ नरगपंचायतींमध्ये करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सन १९९३ पूर्वीच्या रोजंदारीवरील परंतु नंतर नगरपरिषद सेवेत सामावून घेतलेल्या कर्मचा-यांचे वारसास लाड कमिटीच्या शिफारशीनुसार (वशिला) वारस हक्काने सामावून घेण्याबाबत**

**(१२) ११२४५३ (१८-०४-२०१८) श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन १९९३ पूर्वीच्या रोजंदारीवरील परंतु नंतर नगरपरिषद सेवेत सामावून घेतलेल्या कर्मचा-यांचे वारसास लाड कमिटीच्या शिफारशीनुसार (वशिला) वारस हक्काने सामावून घेण्याबाबत मा. नगरविकास राज्यमंत्री तसेच प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०१६ पासून लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी केली आहे, हे खरे काय,
(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०२-२०१९) :** (१) व (२)

- नगरपरिषद कर्मचारी संघटना व लोकप्रतिनिधींकडून प्राप्त निवेदनांमध्ये याबाबतची मागणी केली आहे, हे खरे आहे.
- दि.१०.०३.१९९३ पूर्वीच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करताना नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने दि.२०.०४.२००१ व दि.१६.०५.२००५ अन्वये मार्गदर्शक तत्वे/ अटी व शर्ती विहित केल्या आहेत.

- सदर तरतुदीनुसार रोजंदारी आस्थापनेवरील सर्व नियुक्त्या नियमित करताना त्या व्यक्तिच्या सेवानिवृत्ती/मृत्युनंतर सदर पद व्यपगत होते.
- तसेच, पद व्यपगत होत असल्याने, कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वाचा लाभ अनुज्ञेय राहत नाही, अशी तरतूद आहे.
- नगरपरिषद संघटनांनी शासनाकडे केलेल्या निवेदनातील याबाबतची मागणी तपासून नियमोचित कार्यवाही प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरातील उपकरप्राप्त तसेच पागडी पध्दतीवरील इमारतींचा रखडलेला पुनर्विकासाचा "महारेरा" कायद्यात समाविष्ट करण्याचा प्रस्ताव**

**(१३) ११७०४७ (२३-०७-२०१८) श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील उपकरप्राप्त तसेच पागडी पध्दतीवरील इमारतींचा रखडलेला पुनर्विकासाचा "महारेरा" कायद्यात समाविष्ट करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०२-२०१९) :** (१), (२), व (३) म्हाडा व एसआरए प्रकल्पांना रेरा कायदा लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

तथापि, पागडी पध्दतीवरील इमारतींच्या पुनर्विकासाबाबत "रेरा" कायदा लागू करण्याची बाब विचाराधीन नाही.

---

**पंतप्रधान आवास योजनेशी सुसंगत झोपडीधारकांना घरे देण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आल्याबाबत**

**(१४) ११७२९० (२३-०७-२०१८) श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान आवास योजनेशी सुसंगत झोपडीधारकांना घरे देण्यासाठी दिनांक ०९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीला अहवाल सादर करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, या अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०२-२०१९) :** (१) होय. तथापि, सदर शासन निर्णय दि. १०.०१.२०१८ चा आहे.
(२) होय.
(३) सदर समितीचा अहवाल शासनास दि. २९.१०.२०१८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी सादर केला आहे. बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली २०१४ - २०३४ मध्ये पात्र झोपडीधारकांना २५ चौ.मी. (२६९ चौ.फुट) ऐवजी २७.८८ चौ.मी. (३०० चौ.फुट) पुनर्वसन सदनिका देण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतूदीनुसार व प्राप्त अहवालाची छाननी करून तपशिलावर शासन निर्णय निर्गमित करण्याचा प्रस्ताव प्राधिकरण स्तरावर व गृहनिर्माण विभाग स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महारेराकडून करण्यात आलेल्या अभ्यासांतर्गत मुंबईसह राज्यात तब्बल २९३ अनधिकृत गृह प्रकल्पाचे काम सुरु असल्याबाबत**

**(१५) १२०९०० (२३-०७-२०१८) श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील म्हाडा व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या पुनर्विकासाच्या योजनांतर्गत विकासकांकडून फसवणूक होत असल्याने म्हाडा व झोपडपटटी पुनर्वसन योजनेची कामे महारेरा अंतर्गत आणण्यासाठी निर्णय घेण्यात येणार असल्याचे मा.गृहनिर्माण मंत्री यांनी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महारेराकडून करण्यात आलेल्या अभ्यासांतर्गत मुंबईसह राज्यात सुमारे २९३ अनधिकृत गृह प्रकल्पाचे काम सुरु असल्याची माहिती महारेरा समोर माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महारेराने याची गंभीर दखल घेत या गृह प्रकल्पा विरोधी कारवाई करण्याचे आदेश संबधित यंत्रणांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दिनांक १ मे, २०१७ पासून महारेरा कायद्याची राज्यात अमलंबजावणी सुरु झाली त्या नंतर दिनांक ३० एप्रिल, २०१८ पर्यंत महारेराकडे ९०३८ तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, १७१० या तक्रारी अवैध होत्या, हे ही खरे आहे काय, तसेच उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०२-०२-२०१९) :** (१) होय.
(२) आणि (३) होय.

महारेराकडे प्राप्त झालेल्या तक्रारीतील माहितीनुसार एकूण २९३ प्रकल्प महारेराकडे नोंदणी न झाल्याचे आढळून आले होते. त्यापैकी ८५ प्रकल्पांची माहिती संबंधित नियोजन प्राधिकरणाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी कळविण्यात आली असून उर्वरित प्रकरणांबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) होय हे खरे आहे.
(५) प्राप्त झालेल्या तक्रारींची शहानिशा करण्याची कार्यवाही महारेरा मार्फत सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**महारेरा प्राधिकरणाचे आदेश, निकाल व परिपत्रक मराठीत उपलब्ध करण्याबाबत**

**(१६) १२३०५१ (२३-०७-२०१८) श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महारेरा प्राधिकरणाचे निकाल, आदेश आणि परिपत्रक केवळ इंग्रजी भाषेत उपलब्ध केली जात असल्याने मराठी माणसांची गैरसोय होत असून ते मराठीत उपलब्ध करून देण्याबाबत दिनांक ५ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास काही नागरिकांनी ईमेलद्वारे मा. मुख्यमंत्री तसेच महारेरा प्राधिकरण यांना निवेदन केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने महारेरा प्राधिकरणाचे निकाल, आदेश आणि परिपत्रक मराठी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (३१-०१-२०१९) :** (१) नाही.

अशा आशयाचे निवेदन ई-मेलद्वारे प्राप्त झालेले नसल्याचे संबंधितांनी कळविले आहे.

(२) व (३)

महारेरा प्राधिकरण तसेच अपिलीय न्यायाधिकरणाचे कामकाज हे अर्ध न्यायिक स्वरुपाचे आहे. हे कामकाज महाराष्ट्र राजभाषा (वर्जित प्रयोजन) नियम, १९६६ च्या नियम २ च्या पोटनियम ४ मध्ये मोडत असल्याने, याबाबतचे आदेश /निकाल मराठी भाषेमध्ये देणे बंधनकारक नाही असे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिल्यामुळे, याबाबत कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालाड (पूर्व) येथील रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्या ८२ झापेडीधारकांचे एसआरए अंतर्गत पुनर्वसन करण्याबाबत

**(१७) १२६४१९ (०४-१२-२०१८) श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर मालाड (पूर्व) येथील वाहतूक कोंडी समस्या सोडविण्यासाठी मल्लिका हॉटेल ते हुमेरा पार्क-दिंडोशी या प्रलंबित रस्ता रूंदीकरणाच्या विकास कामात अडसर ठरलेल्या बाधित ८२ झोपडीधारकांचे दिनांक ०१ जानेवारी, २००० पर्यंतच्या झोपडयांना सरंक्षण देण्याच्या शासन अधिनियमानुसार नव्याने सर्व्हेक्षण व परिशिष्ट-२ ची कार्यवाही करणे व त्यानंतर या झोपडीधारकांचे एसआरए योजनेअंतर्गत पुनर्वसन करणेबाबत एसआरए प्राधिकरणातर्फे अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००० च्या शासन कायदयानुसार बाधित ८२ झोपडीधारकांचे सर्व्हेक्षण व परिशिष्ट-२ करणेबाबत प्राधिकरणास लागत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, मालाड (पूर्व), भागात वाहतूक कोंडीच्या समस्येमुळे नागरीक व शालेय, महाविद्यालयात विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय दूर करण्यासाठी सदरहू रस्ता रूंदीकरणातील ८२ झोपडीधारकांचे सर्व्हेक्षण व परिशिष्ट-२ तातडीने करणाच्या दृष्टीने प्राधिकरणातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, अद्यापपर्यंत एसआरए प्राधिकरणातर्फे करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. प्रकाश महेता (०१-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही. मौजे दिंडोशी, ता.बोरीवली, न.भू.क्र. १३४,१३४/१ते२५, १३५,१३५/१ते१२, १३६,१३६/१ ते १३८, १३७ व १३७/१ या मिळकतीवरील विकासक मे.बहिस्ट एंटरप्रायझेस प्रा. लि. यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या दिंडोशी पाडा जनता सेवक संघ सहकारी गृहनिर्माण संस्थेचे मुळ परिशिष्ट-२ अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण) तथा नियंत्रक यांनी SRD अंतर्गत दि.१८.४.१९९५ रोजी निर्गमित केलेले आहे.

सदर परिशिष्ट-२ मध्ये एकूण १०५६ झोपडीधारकांचा समावेश असून त्यापैकी ९५२ झोपडीधारक पात्र आहेत.

सदर प्रकरणातील परिशिष्ट-२ प्रमाणे पात्र असलेल्या झोपडीधारकांऐवजी सद्य:स्थितीत जागेवर आढळून येणाऱ्या झोपडीधारकांच्या पात्रतेबाबत हस्तांतरणाच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने शासनाकडून मार्गदर्शन मागविले होते. त्यानुसार शासनाने दि.१५.१०.२०१८ च्या पत्रान्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास मार्गदर्शन केले आहे.
(२), (३) व (४) शासनाने केलेल्या मार्गदर्शनाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी शासन निर्णय दि.०२.०१.२०१२, दि. १६.५.२०१५ व दि.१६.५.२०१८ च्या तरतुदीनुसार एकूण योजनेतील झोपडीधारकांच्या यथास्थिती पात्रता व सशुल्क पुनर्वसनाकरीता आवश्यक योग्यतेनुसार तपासणी/ पडताळणी करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व सक्षम प्राधिकारी यांच्या समन्वयाने योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**मुंबईतील रहिवाशांच्या ५०० चौ.फूटाच्या घरांना महानगरपालिकेतर्फे करमाफी व ७०० चौ.फूटाच्या घरांना कर सवलत देण्याबाबत**

**(१८) १२६४६६ (०५-१२-२०१८) श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील रहिवाशांच्या ५०० चौ.फुटाच्या घरांना महानगरपालिकेतर्फे करमाफी व ७०० चौ.फूटाच्या घरांना कर सवलत देण्याचा मुंबई महानगरपालिकेचा ठराव माहे जुलै, २०१८ पर्यंत शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठराव शासनाकडे पाठविण्याची मागणी मुंबईतील एका राजकीय पक्षाच्या आमदारांनी दिनांक ०६ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) :** (१) बृहन्मुंबईतील ५०० ते ७०० चौ. फुटापर्यंतच्या सदनिकांना मालमत्ता कर माफ करण्यासंदर्भातील आवश्यकतेनुसार सुयोग्य प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) बृहन्मुंबईतील ५०० ते ७०० चौ. फुटापर्यंतच्या सदनिकांना मालमत्ता कर माफ करण्याबाबतचा प्रस्ताव प्रक्रियाधीन असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

**गिरणी कामगारांचा घरांचा प्रश्न सोडविण्याबाबत**

**(१९) १२६७०३ (०४-१२-२०१८) श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.जयकुमार गोरे (माण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वयोवृध्द गिरणी कामगार ग्रामीण भागात राहतात असल्याने कामगारांना घरांसाठी ये-जा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०५-०१-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) गिरणी कामगार / वारस सोडतीत यशस्वी झाल्यानंतर ते पात्र ठरल्यानंतर त्यांना सदनिकेच्या विक्री किंमतीचा भरणा करण्यासाठी तात्पुरते देकारपत्र समन्वयक यंत्रणा म्हणून नियुक्त केलेल्या बँकेमार्फत पाठविण्यात येते, सदर तात्पुरते देकारपत्र त्रयस्थ व्यक्तिच्या हातात जावू नये, यासाठी मुळ गिरणी कामगार / वारस यांना उपस्थित रहावे लागते.

(३) सोडतीत यशस्वी झालेले गिरणी कामगार / वारस वयोवृध्द असल्यास किंवा आजारी असल्यास त्यांनी आवश्यक ते पुरावे सादर केल्यानंतर योग्य वाटल्यास त्यांनी केलेल्या विनंतीवरुन सदर गिरणी कामगार / वारस यांना त्यांच्या घरी जावून वितरणाची कार्यवाही पूर्ण करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण बाधित**
**शेतकऱ्यांना १२.५% परतावा मिळणेबाबत**

**(२०) १२७१३२ (०४-१२-२०१८) ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९७२ ते १९८३ दरम्यान पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण संपादीत जमीनीच्या मोबदल्यापोटी १२.५% (साडेबारा टक्के) परतावा क्षेत्र शेतकऱ्यांना देण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांना वेळोवेळी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने पिंपरी चिंचवड प्राधिकरणाने संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा १२.५% (साडेबारा टक्के) परतावा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) व (२) सदर प्रकरणी वेळोवेळी निवेदने प्राप्त झाली आहेत, तथापी सद्यस्थितीत शासन स्तरावर सन १९७२ ते सन १९८३ दरम्यान संपादित व निर्वेध ताबा मिळालेल्या जमिनीच्या मोबदल्यात सदरहू जमिन मालकांना १२.५ टक्के जमिन परताव्याबाबत शासनाचे धोरण नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई शहराला पाणी पुरवठा करणा-या भिवंडीतील वाहिन्यालगत मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकामे व गोदामे असल्याबाबत

**(२१) १२८४६५ (०६-१२-२०१८) श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहराला पाणी पुरवठा करणा-या जलवाहिन्या भिवंडी शहरातून जात असून भिवंडीतील जल वाहिन्यालगत मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकामे व अनधिकृत गोदामे असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलवाहिनी लगत रस्त्यावर खाजगी जड वाहतुकीमुळे मोठ-मोठे खड्डे पडले असून वाहतूक कोंडी तसेच वायु प्रदूषण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१), (२) व (३) मुंबई शहराला पाणी पुरवठा करणा-या जलवाहिन्याची लांबी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात अंदाजे १० कि.मी.इतकी आहे.

सदर जलवाहिन्यांच्या सभोवताली भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामे वन विभागाच्या जमिनीवर आहेत.

शासन परिपत्रक दिनांक ०७.०९.२०१० नुसार अनधिकृत बांधकामाविरुध्द नियमोचित कारवाई करण्याबाबत भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने वन विभागास कळविले आहे.

सदर जलवाहिन्या लगतचा रस्ता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खाजगी मालकीचा आहे. सदर रस्त्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वाहनाव्यतीरिक्त इतर वाहनांस वाहतुकीसाठी परवानगी नाही. त्यामुळे सदर ठिकाणी वाहतुक कोंडी होण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील जलवाहिन्या लगतच्या अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तासगांव शहरात (जि. सांगली) नगरपालिकेत निविदा दाखल करण्यासाठी एका ठेकेदारासोबत आलेल्या नगरसेवक व ठेकेदार यांच्यात झालेला वाद**

**(२२) १२८६३० (०६-१२-२०१८) श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तासगांव शहरातील (जि. सांगली) वेगवेगळ्या १२ कामांसाठी नगरपालिकेकडून साडेतीन कोटी रुपयांच्या निविदा मागविण्यात आल्या तसेच ऑनलाईन निविदा दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर निविदा दाखल करण्यासाठी एका ठेकेदारासोबत आलेल्या नगरसेवक व ठेकेदार यांच्यात मारामारी झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, या संदर्भात पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१९) :** (१) अशा प्रकारची कोणतीही घटना नगरपरिषद कार्यालयामध्ये घडलेली नाही, असे मुख्याधिकारी, तासगांव नगरपरिषद यांनी कळविले आहे. तसेच अशा स्वरुपाचा तक्रार अर्ज अथवा दखलपात्र / अदखलपात्र गुन्हा तासगाव पोलीस ठाण्यात दाखल नाही, असे पोलीस अधीक्षक, सांगली यांनी कळविले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील कचरा उचलण्याच्या निविदा प्रक्रियेत होत असलेली अनियमितता

**(२३) १२८६७९ (०६-१२-२०१८) श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील कचरा उचलण्याच्या निविदा प्रक्रियेत होत असलेल्या अनियमितता व प्रशासनाच्या गैरकारभाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री महोदय व आयुक्त, भिवंडी शहर महानगरपालिका यांच्याकडे चौकशीची मागणी माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुसऱ्यांदा काढण्यात आलेल्या निविदांमध्ये ३ ठेकेदारांनी प्रतिसाद दिला असताना ती प्रक्रिया रद्द का करण्यात आली व तिसऱ्यांदा निविदा प्रक्रिया काढण्याची कारणे कोणती,

(३) असल्यास, सन २०१७ - १८ साठी ही निविदा प्रक्रिया असताना हे आर्थिक वर्ष संपल्यानंतर दिनांक १२ जुलै, २०१८ रोजी झालेल्या महासभेच्या अजेंड्यावर सदर विषय येणे गरजेचे असताना तो विषय अजेंड्यावर न आणता महापौर आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांनी मंजुरी देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, निविदा प्रक्रियेतील विलंब करणाऱ्या व ज्या आर्थिक वर्षाकरिता निविदा काढणे आवश्यक असताना सदर वर्ष संपल्यानंतर महासभेत विषय मंजूर करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) व (२) होय.

- भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने नाले व गटार सफाईसाठी तीन वेळा निविदा प्रसिध्द केली होती. तथापि, सदर निविदेस प्रतिसाद मिळाला नाही.
- तथापि, भिवंडी महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या दिनांक ०४.०८.२०१८ च्या ठरावान्वये पाच वर्षांकरीता घनकचरा व्यवस्थापनासाठी निविदा प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला होता.

  तथापि, भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेसाठी शासनस्तरावर घनकचरा प्रकल्प अहवाल मंजूर होऊन कार्यवाही सुरु झाल्याने सदरच्या ठरावान्वये प्रसिध्द करण्यात आलेली निविदा रद्द करण्यात आली.
- राज्य शासनाने कोकण विभागातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत घनकचरा गोळा करणे व शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे याकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल करण्यासाठी ICUC Consultants Pvt. Ltd. संस्थेची नेमणुक केली आहे.
- उपरोक्त सल्लागार संस्थेने भिवंडी शहरासाठी घनकचरा प्रकल्प अहवाल तयार केला आहे. सदर अहवालास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व शासनाची मंजूरी प्राप्त झाली आहे.

- तद्नुषंगाने भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका स्तरावर नव्याने निविदा राबविण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(३) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीताच्या निविदा अंतिम झाल्याच्या दिनांकापासून १ वर्षाच्या कालावधीकरीता बोलविण्यात येणार होती.

भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने प्राप्त निविदेच्या दराने येणाऱ्या वार्षिक खर्चास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी महासभेकडे प्रस्ताव सादर केला.

महासभेतील चर्चा व लोकप्रतिनिधींकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशी दरम्यान सदर दोन्ही निविदा एकाच निविदाकाराने भरल्याचे निदर्शनास आल्याने निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत अपात्र झोपडपट्टीवासियांना घरे देण्यात येणार असल्याबाबत**

**(२४) १२८७८६ (०४-१२-२०१८) श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०११ पर्यंतच्या अपात्र झोपडपट्टीवासियांना पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरे देण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ जानेवारी, २००० ते १ जानेवारी, २०११ पर्यंतच्या अपात्र झोपडपट्टीधारकांना एसआरए अंतर्गत घरे मिळतील पण ती सशुल्क असतील, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई, ठाणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील (एसआरए) सशुल्क पुनर्वसनयोग्य झोपडीधारकांच्या सदनिकेची किंमत निश्चित करण्याचे अधिकार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारणाच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांना देण्याचा निर्णय गृहनिर्माण विभागाने माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त योजनेंतर्गत दिली जाणारी घरे किती कालावधीत तयार होणार आहेत व कधीपर्यंत झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन होणार आहे ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०२-२०१९) :** (१) होय.

(२) होय. दिनांक १६.०५.२०१८ रोजी या संबंधीचे शासन निर्णय निर्गमित केले आहेत.

(३) होय. दिनांक ०७.०९.२०१८ रोजी या संबंधीचे निकष निश्चित करुन निकषानुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन इमारतीमधील सदनिकांची किंमत निश्चितीचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना देण्यात आले आहेत.

(४) योजनानिहाय त्या त्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत सशुल्क पुनर्वसन सदनिका तयार होताच सशुल्क पुनर्वसनास पात्र असणाऱ्यांना ती उपलब्ध करण्यात येतील.

---

**गोळीबार खार-सांताक्रुझ (पूर्व) येथील पुनर्वसन प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(२५) १२९६४२ (०४-१२-२०१८) डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोळीबार खार-सांताक्रुझ (पूर्व) येथील विकासक मे.शिवालिक व्हेन्चर प्रा.ली. च्या वतीने ३ के अंतर्गत पुनर्वसन प्रकल्पाला शासनाकडून मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा प्रकल्प गत ९ वर्षापासून प्रलंबित असून झोपडीधारकांना घरभाडे नियमित दिले जात नसून अदयाप पुनर्वसन इमारत बांधण्याचा प्रस्ताव तयार केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विकासक प्रकल्प पुर्ण करण्यास असमर्थ असल्याने येथील झोपडधारकांनी सदर प्रकल्पाची मंजूरी रद्द करुन शासनामार्फत ३ के प्रकल्प पूर्ण करणेबाबत दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.गृहनिर्माण मंत्री यांना विनंती अर्ज केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या विनंती अर्जानुसार शासनाने सदरील विकासकावर कारवाई करुन सदर प्रकल्पाचा विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने १९ पुनर्वसन इमारतींचे आराखडे मंजूर केले आहेत. त्यापैकी ७ इमारतींकरीता पुर्ण व ४ इमारतींस अंशत: भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित झाले आहे. सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील एकूण १३२ रहिवाशांना घरभाडे मिळाले नसल्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या तक्रारींवर प्राधिकरणाच्या स्तरावर सुनावणी घेऊन ११६ रहिवाशांना घरभाडे देण्याचा निर्णय झालेला आहे. उर्वरीत १६ रहिवाशांच्या तक्रारींवर सुनावणी सुरु असून तद्नंतर कोणत्याही सभासदाची भाडे न मिळाल्याची तक्रार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्राप्त झालेली नाही.

(३) खार सांताक्रुझ जवाहर नगर गोळीबार झोपडपट्टी संयुक्त कृती समिती यांचे शासनास प्राप्त झालेले दि.२०.०२.२०१८ चे निवेदन दि.२२.०३.२०१८ च्या पत्रान्वये योग्य त्या कार्यवाहीस्तव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास पाठविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**मागाठाणे येथील न.भू.क्र. २१५,२२१(पार्ट) ,२२३(पार्ट ) ,२२५ ते २५८,२५९(पार्ट) २६(पार्ट) व्हीलेज मागाठाणे, देवीपाडा, बोरिवली,मुंबई येथील झोपडपट्टीधारकांना न्याय मिळण्याबाबत**

**(२६) १३००२८ (०४-१२-२०१८) श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागाठाणे येथील न.भू.क्र. २१५,२२१(पार्ट), २२३(पार्ट),२२५ ते २५८,२५९(पार्ट) २६(पार्ट) व्हीलेज मागाठाणे, देवीपाडा, बोरिवली,मुंबई येथील झोपडपट्टीधारकांना न्याय मिळण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, नविन प्रशासकीय भवन, वांद्रे, मुंबई यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. प्रकाश महेता (०१-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाकाली एस.आर.ए. सह.गृह.नि.संस्थेतर्फे किंवा अन्य वैयक्तिक सभासदांची भाडे न मिळण्याबाबतची कोणतीही तक्रार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास प्राप्त झालेली नाही.
तसेच विकासकांच्या भागीदार बदलण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अभिलेखामध्ये नोंद आढळत नाही त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उदभवत नाही, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(३) प्रश्न उद्भवत  नाही

---

**मुंबईत असंख्य पुनर्विकास रखडलेल्या प्रकल्पातील ग्राहकांना महारेरातंर्गत सामावून घेण्याबाबत**

**(२७) १३००८२ (०४-१२-२०१८) श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत असंख्य पुनर्विकास प्रकल्पात विकासकाने भाडे देणे बंद केल्याने वर्षानुवर्षे नव्या घरांच्या प्रतीक्षा करीत असलेल्या लक्षावधी ग्राहकांना महारेरा अंतर्गत दिलासा मिळेल अशी ग्वाही गृहनिर्माण खात्याचे अतिरिक्त प्रधान सचिव यांनी दिल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ च्या दुस-या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्विकासाबाबतचा शासकीय प्रस्ताव तयार असून झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसह सर्व पुर्नविकास प्रकल्पातील जुन्या राहिवाशांना ही महारेरा अंतर्गत सामावून घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडा प्राधिकरणात आणि सर्वनगर नियोजन प्राधिकरणातही एक खिडकी योजना अंमलात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने कोणती चौकशी केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०२-२०१९) :** (१), (२) ,(३), (४) व (५) म्हाडा तसेच झोपडपट्ट पुनर्वसन प्रकल्पांना रेरा कायदा लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**वीर मरण आलेल्या मेजर कौस्तुब राणे यांना श्रध्दांजली वाहण्याच्या दिवशीच मीरा रोड येथील नगरसेवकाने आपला वाढदिवस धुमधडाक्यात साजरा केल्याबाबत**

**(२८) १३०५६५ (०५-१२-२०१८) श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काश्मिरच्या गुरेज सेक्टर मध्ये घुसखोर दहशतवाद्यांशी लढताना ठाणे जिल्ह्यातील मीरा रोड येथे राहणाऱ्या मेजर कौस्तुब प्रकाश राणे यांना वीर मरण प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेजर राणे यांना वीर मरण प्राप्त झाल्यामुळे मीरा रोड परिसरातील शोकग्रस्त नागरीकांनी त्यांना श्रध्दांजली वाहण्याचा कार्यक्रम सकाळी आयोजित केला असता त्याच दिवशी मीरा रोडच्या एका नगरसेवकाने त्यांचा वाढदिवस धुमधडाक्यात साजरा केला असून या कार्यक्रमला नगरसेवकांसह तेथील लोकप्रतिनिधीसुध्दा उपस्थित राहिले असून डी.जे च्या तालावर जल्लोषात साजरा करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ठाणे ग्रामीण जिल्हयातील काशिमिरा पोलीस ठाण्याचे अभिलेखावर अर्जदार श्री. कृष्णा छगनलाल गुप्ता, भाईंदर (प.) यांनी महाराष्ट्र शासनाचे आपले पोर्टलवर ई-मेलद्वारे मेजर कौस्तुब राणे यांना वीर मरण आले त्या दिवशी श्री. आनंद मांजरेकर, स्थानिक नगरसेवक यांचा वाढदिवस त्यांच्या कार्यकर्त्यांनी पोलीस तथा प्रशासकीय कार्यालयाची परवानगी न घेता सार्वजनिक ठिकाणी माईक व  लाउड स्पिकरचा वापर केल्याचे कारणाने तक्रार अर्ज प्राप्त झाला, ही वस्तुस्थिती आहे.

(३) सदर तक्रार अर्जाच्या चौकशीअंती गैरअर्जदार नगरसेवक व त्यांचे सहकारी यांनी पोलीस तथा प्रशासकीय कार्यालयाची परवानगी न घेता गैरअर्जदार यांचे वाढदिवसाचे दिवशी

सार्वजनिक ठिकाणी माईक व लाउड स्पिकरचा वापर केल्याचे निदर्शनास आल्याने, सदर प्रकरणी त्यांचेविरूध्द काशिमिरा पोलीस ठाणे येथे पो. नॉ. रजि. क्र. २२६/२०१८ व २२७/२०१८ मु. पो. अधिनियम कायदा कलम ३३ (आर), ३(३), ३३(डब्लू)(१) अन्वये गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात आली असून, मा. न्यायालयाकडून त्यांना प्रत्येकी रू. ५००/- इतकी दंडाची शिक्षा करण्यात आली असल्याचे, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अक्कलकोट तीर्थक्षेत्र (जि. सोलापूर) शहरासह मैदर्गी, दुधणी या तीनही नगरपालिकांचा कारभार मुख्याधिकाऱ्यांविना सुरु असल्याबाबत

**(२९) १३०५९६ (०५-१२-२०१८) श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट तीर्थक्षेत्र (जि. सोलापूर) शहरासह मैदर्गी, दुधणी या तीनही नगरपालिकांचा कारभार मुख्याधिकाऱ्यांविना सुरु असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज, पाणी, रस्ते, आरोग्य याबरोबरच विविध विकासकामांवर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्थानिक नागरीकांची होणारी अडचण तसेच प्रलंबित असलेली विकासकामे पुर्ववत सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

• मुख्याधिकारी, अक्कलकोट नगरपरिषद, जि.सोलापूर या पदावर श्री. प्रदीप ठेंगल यांची दिनांक ३१ मे, २०१७ रोजीच्या शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. सबब ते पद ऑगस्ट, २०१८ मध्ये रिक्त नव्हते.

• मुख्याधिकारी, दुधनी नगरपरिषद, जि.सोलापूर या रिक्त असलेल्या पदावर श्री. धैर्यशील जाधव हे रुजू झालेले आहेत.

• मुख्याधिकारी, मैदर्गी नगरपरिषद, जि.सोलापूर हे पद सध्या रिक्त असून श्री. एन.के.पाटील, मुख्याधिकारी, मोहोळ नगरपरिषद यांच्याकडे त्या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविला आहे.

(२) व (३)

• तिर्थक्षेत्र अक्कलकोट, मैदर्गी व दुधनी नगरपरिषदेमध्ये वीज, पाणीपुरवठा, आरोग्य व

विकास कामे नियमितपणे सुरु आहेत. तसेच दुधणी नगरपरिषदेमध्ये पाणी टंचाई निर्माण झाली आहे. तथापि, त्यासाठी विंधण विहिरी घेण्याकरीता भूजल सर्वेक्षण यांच्या मदतीने नियोजन केले असून लवकरात लवकर पाण्याची टंचाई निवारण करणेची दक्षता घेण्याच्या सूचना मुख्याधिकारी यांना दिल्या असल्याचे जिल्हा प्रशासन अधिकारी, सोलापूर यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गतच्या इमारतींमध्ये ३० हजार ५६४ रहिवाशांचे बेकायदा वास्तव्य असल्याबाबत**

**(३०) १३०६६२ (०४-१२-२०१८) श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या पाहणीमधून झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गतच्या इमारतींमध्ये ३० हजार ५६४ रहिवाशांचे बेकायदा वास्तव्य असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु बेकायदा वास्तव्य करणाऱ्यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०२-२०१९) :** (१) मा. उच्च न्यायालयातील याचिका क्र. ७५/२०१५ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या दि.१२.०९.२०१८ च्या आदेशामध्ये या आशयाचा उल्लेख होता. तो दि.३०.१०.२०१८ च्या आदेशान्वये दुरुस्त केला आहे.
(२) मा. उच्च न्यायालयातील याचिका क्र. १६८५/२०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. ०५.०८.२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने वाटप केलेल्या पुनर्वसन सदनिकांचे सर्वेक्षण केले असता १३,५६४ पुनर्वसन सदनिकांमध्ये मूळ लाभार्थी झोपडीधारक राहात नसल्याचे आढळले आहे. प्राधिकरणाने सदर माहिती संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्यांकडे पूढील कार्यवाहीसाठी पाठविली असून महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३E नुसारची कारवाई संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३१) १३०८१५ (०५-१२-२०१८) श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहराची हद्दवाढ नको म्हणून शहराचा सुनियोजित विकास करण्याकरिता " कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण " ची स्थापना करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्राधिकारणामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या प्राधिकरणाने विकासकामांकरिता गत मे महिन्यात शासनाकडे १० कोटी रुपयांची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरचा निधी अद्यापही प्राधिकरणाला देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्राधिकरणामार्फत आतापर्यंत कोल्हापूर शहरात कोणकोणते प्रकल्प हाती घेण्यात आले व त्याची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१९) :** (१) होय. महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना दि. १६.०८.२०१७ अन्वये शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४२ ग नुसार कोल्हापूर महानगरपालिका परिसरातील ४२ गांवासाठी क्षेत्र विकास प्राधिकरणाची स्थापना केली आहे.

(२) सदरहू क्षेत्राच्या सुनियोजीत विकासासाठी / विकास साधणेसाठी उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार जमीन विकास व बांधकाम या विकास विषयक परवाना प्रकरणात आवश्यक कार्यवाही प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.

(३) व (४) कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाने त्यांचे विकास कामकाजाकरिता रु.१० कोटी बीज भांडवल मागणी प्रस्ताव दि.२३/०७/२०१८ अन्वये शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला आहे. सदर बाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(५) कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणातर्फे त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये विविध विकास कामे करण्याचे नियोजन असून त्यामध्ये प्रामुख्याने नगर रचना योजना तयार करणे, तसेच प्राधिकरण हददीतील प्रस्तावित रस्त्यांची विकास कामे करणे, नदीवरील पूलाचे बांधकामे करणेचे नियोजन आहे. या व्यतिरिक्त सरकारी मालकीच्या जमिनी सार्वजनिक उपयोगासाठी ताब्यात घेण्यात येणार असून सदर जमिनी प्राधिकरणाच्या ताब्यात आल्यानंतर त्यांचा उपयोग बगिचा, स्मशानभूमि, क्रिडांगण, बहुउद्देशीय सभागृह, दवाखाना व प्रसूती गृह , पंतप्रधान आवास योजना प्राथमिक शाळा या प्रयोजनासाठी करण्यात येणार आहे. तसेच प्राधिकरणामार्फत काही गावांसाठी एकात्मिक पाणीपुरवठा योजना व मलनि:स्सारण योजना तयार करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. तसेच अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेचे नुतनीकरण करणे आणि स्वतंत्र प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तयार करणेचे काम प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येणार आहे.

___

**राज्यातील नगरपरिषदा व नगरपालिकांतील कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपातत्वावर शासकीय सेवेत समावून घेण्याबाबत**

**(३२) १३०९५६ (०८-१२-२०१८) श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय सेवेत असतांना कर्मचारी अथवा अधिकारी दिवंगत झाल्यास किंवा गंभीर आजार, अपघात यामुळे शासकीय सेवा करण्यास वैद्यकीयदुष्टया कायम असमर्थ ठरल्यास त्यांच्या पाल्यांना अनुकंपातत्वावर शासन सेवेत सामावून घेण्याबाबत शासन निर्णय अकंपा -१२१७/प्र.क.१०२/आठ, दिनांक २१ सप्टेंबर २०१७ निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषद व नगरपालिकांतील कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपातत्वावर सामावून घेण्याबाबतचा मा.उपसंचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी मुंबई यांनी नगरविकास विभागाकडे सादर केलेला प्रस्ताव निर्णयविना अदयापर्यंतच शासनाकडेच प्रलंबित राहिल्याने नगरपरिषदा व नगरपालिका कर्मचाऱ्यांचे पात्र व गरजू वारस शासकीय नोकरीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरपरिषद व नगरपालिकांतील कर्मचाऱ्यांचे वारसांना अनुकंपातत्वावर सामावून घेण्याबाबतचा मा. उपसंचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी नगरविकास विभागाकडे सादर केलेला प्रस्ताव प्रलंबित राहण्याबाबतची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त निर्णयावर केव्हापर्यंतच निर्णय होणे अपेक्षित आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४)

• शासकीय सेवेतील अधिकारी / कर्मचारी दिवंगत झाल्यास त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्ती देण्यासाठी दि. २१ सप्टेंबर, २०१७ रोजी सविस्तर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केला आहे..

• सदर शासन निर्णयानुसार आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांच्या दि. २०.१०.२०१८ च्या पत्रान्वये नगरपरिषद व नगरपालिकांतील कर्मचाऱ्यांना वारसांना अनुकंपा नियुक्ती योजने संदर्भातील सुधारीत शासन निर्णय लागू करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे.

• सदर प्रस्तावाचे अनुषंगाने शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही सुरू आहे.

---

**श्रीक्षेत्र पंढरपूर येथील नगरपालिकेचे यात्रा अनुदान सुमारे अडीच महिन्यांपासून दिले नसल्याबाबत**

**(३३) १३१२२३ (०८-१२-२०१८) श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीक्षेत्र पंढरपूर येथील पंढरपूर नगरपालिकेचे यात्रा अनुदान सुमारे अडीच महिन्यांपासून शासनाने दिले नसल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने यात्रा अनुदान थकविल्यामुळे नगरपालिका आर्थिक संकटात आली असून संबंधित प्रशासन, कर्मचारी यांचे सुमारे २ महिन्यांपासूनचे वेतन थकीत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त अनुदान यात्रा संपल्यानंतर देण्याचे अनुज्ञेय असतांनाही इतके दिवस प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने अनुदान लवकरात लवकर देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०१-२०१९) :** (१), ( २), (३), (४ )व (५)

• यात्राकर रद्द केल्यामुळे राज्यातील सात नगरपरिषदांना यात्रकर अनुदान देण्यात येते.

• त्यानुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध निधीनुसार पंढरपूर नगरपरिषदेला रु.३.४७ कोटी यात्राकर अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

---

## वसई-विरार महानगरपालिकेच्या वालीव प्रभाग समिती `जी' विभाग क्षेत्रातील चिंचोटी परिसरात औद्योगिक गाळे, चाळींचे अनधिकृत बांधकाम होत असल्याबाबत

**(३४) १३१३५३ (०८-१२-२०१८) श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेच्या वालीव प्रभाग समिती `जी' विभाग क्षेत्रातील चिंचोटी परिसरात औद्योगिक गाळे, खोल्यांच्या चाळींचे अनधिकृत बांधकाम होत असल्याचे दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी प्रभाग समितीचे अधिकारी अपयशी ठरत असून अनधिकृत बांधकामास पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून संरक्षण मिळत असल्याने कोणतीही कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१९) :** (१), (२) व (३) दिनांक १२.०९.२०१८ रोजी अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाली आहे.

तथापि, वसई-विरार शहर महानगरपालिकेने वालीव प्रभाग समिती "जी" विभाग क्षेत्रातील चिंचोटी परिसरातील अनधिकृत बांधकामांवर खालील प्रमाणे कार्यवाही केली आहे:-

- चिंचोटी परिसरात अद्यापपर्यंत ७८ वेळा निष्कासनाची मोहिम होती घेण्यात आली आहे.
- तसेच सुमारे २७० खोल्या, १३ गोडाऊन, ७२ गाळे, ६५२ प्लिंथ निष्कासित करण्यात आले आहेत.
- प्रभाग समिती "जी" अंतर्गत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमान्वये १६५ नोटीस व १६ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
- तसेच माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये प्रभाग समिती "जी" मध्ये सुमारे १.५० लाख चौ. फुटाची बांधकामे निष्कासित करण्यात आले असल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरा-भाईंदर महानगरपालिका परिसरात बोगस कागदपत्राव्दारे अनेक बेकायदा इमारती बांधण्यात येत असल्याबाबत**

**(३५) १३१५७३ (०८-१२-२०१८) डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिका परिसरात बोगस कागदपत्राव्दारे अनेक बेकायदा इमारती बांधण्यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिका अधिकाऱ्यांना प्रत्येक फुटामागे ३००/- रुपये विकासकाने मोजल्यास परवानगी देण्यात येत असल्याची तक्रार ओवला-माजिवडा या विधानसभा क्षेत्रातील लोकप्रतिनिधींनी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१८ च्या शेवठच्या आठवड्यात वा त्या दरम्यान लेखी निवेदनाव्दारे करुन या गैरव्यवहाराची चौकशी करुन पारदर्शक कारवाई करावी अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीतील मागणीच्या अनुषंगाने नगरविकास विभागाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोगस कागदपत्रे व आर्थिक देवाण-घेवाण करुन बेकायदा अनधिकृत इमारतीचे बांधकाम करणाऱ्या विकासक व संबंधित महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०१९) :** (१) • मा. विधानसभा सदस्य यांनी दि. १०.०९.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील नगररचना विभागाकडून झालेल्या विविध विषयांवरील अनियमितताबाबतची तक्रार शासनास प्राप्त झाली.

(२) • सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. १.१०.२०१८ च्या पत्रान्वये आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविण्यात आले.

• आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी दि. १९.१०.२०१८ च्या पत्रान्वये याबाबतचा अहवाल शासनास सादर केले आहे.

• मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेल्या परवानग्या ह्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार असल्याचे तसेच मा.विधानसभा सदस्य यांनी तक्रारीत नमूद केलेल्या आरोपानुसार वस्तुस्थिती दिसून येत नसल्याचे, आयुक्तांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वसई-विरार शहर महानगरपालिकेतील विविध विकास कामांसाठी अनुशेष अनुदानाची रक्कम मिळण्याबाबत

**(३६) १३१६२५ (०८-१२-२०१८) श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध विकास कामांसाठी कोट्यवधी रुपयांची अनुशेष अनुदानाची रक्कम त्वरीत मंजूर करण्याची विनंती वसई-विरार शहर महानगरपालिकेने तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला आहे व त्याची पूर्तता केव्हा होणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१९) :** (१) मा.श्री.हितेंद्र ठाकूर, विधानसभा सदस्य यांनी वसई-विरार शहर महानगरपालिकेस शासनाकडून देय असलेल्या रु.६५३७.२० लाखांची मागणी दिनांक २१.०५.२०१७ च्या पत्रान्वये केली आहे.

(२) उपरोक्त देय अनुदानापैकी रु.२२६२.२० लक्ष इतके अनुदान महानगरपालिकेस प्राप्त झाले असल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सूर्या व उसगाव जलवाहिन्यांचे मुंबई आयआयटीमार्फत स्ट्रक्चरल व हायड्रॉलिक ऑडिट करण्याबाबत

**(३७) १३१६३२ (०८-१२-२०१८) श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या सूर्या व उसगाव जलवाहिन्यांचे मुंबई आयआयटीमार्फत स्ट्रक्चरल व हायड्रॉलिक ऑडिट करण्याचा निर्णय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ऑडिटच्या कामासाठी अंदाजे किती खर्च येणार आहे, सदर ऑडिटनंतर वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात योग्य दाबाने व पुरेसा पाणीपुरवठा करण्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कोणती उपाययोजना करणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१९) :** (१) व (२) सुर्या व उसगाव मुख्य जलवाहिन्यांचे स्ट्रक्चरल व हायड्रॉलिक ऑडिट भारतीय प्राद्योगिक संस्थान, मुंबई (IIT) मार्फत करण्याचा निर्णय वसई विरार-शहर महानगरपालिकेने दिनांक१६.०७.२०१८ रोजी घेतला आहे व याकरीता भारतीय प्राद्योगिक संस्थान, मुंबई (IIT) यांना रुपये ४७,९०,००० अदा करण्यात आले आहेत.

भारतीय प्राद्योगिक संस्थान, मुंबई (IIT) यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याप्रकरणी नियमोचित कार्यवाही करण्यात येणार असल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील सातपुर-अंबड औदयोगिक वसाहतीच्या अंतर्गत सुविधांबाबत**

**(३८) १३१७८८ (०६-१२-२०१८) श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयात ४० वर्षापूर्वी उभारण्यात आलेल्या सातपुर-अंबड औदयोगिक वसाहतीतील अंतर्गत सुविधांची दुरवस्था झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी घेतलेल्या झुम या आढावा बैठकीतील अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना चुकीची माहिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सातपुर-अंबड औदयोगिक वसाहतीस अंतर्गत सुविधा उपलब्ध न झाल्याने उदयोजकांमध्ये प्रशासनाविरोधात असंतोष पसरलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने औद्योगिक वसाहतींना अंतर्गत सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही.
(३) नाही.
(४) नाशिक महानगरपालिकेमार्फत सातपूर व अंबड परिसरातील रस्ते डांबरीकरण करण्याचे एकुण रु.२६ कोटीचे प्रस्ताव तयार करण्यात आले असून, याबाबत महानगरपालिकेमार्फत

निविदा प्रक्रिया सुरु आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिकेमार्फत या भागातील रस्त्यांवरील खड्डे खडी मुरुमाने / बीबीएमने भरण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**शिवणे-खराडी रस्ता, बालभारती-पौड रस्ता आणि कर्वेनगरमधील पाणंद रस्त्याची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३९) १३१८४७ (०५-१२-२०१८) श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोथरूड-कर्वेनगर,सिंहगड रोड मधील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी प्रस्तावित असलेले शिवणे-खराडी रस्ता, बालभारती-पौड रस्ता आणि कर्वेनगरमधील पाणंद रस्त्याची कामे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित प्रशासनाच्या दुर्लक्षतेमुळे या रस्त्यांबाबतची कार्यवाही होऊ शकलेली नसल्याने नागरिकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोथरूड-कर्वेनगर तसेच सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून नदीपात्रातून जाणारा शिवणे-खराडी रस्ता, बालभारती ते पौड रस्ता हे रस्ते प्रस्तावित करण्यात आले असून हे रस्ते पूर्ण व्हावेत यासाठी सातत्याने पाठपुरावाही सुरु असून वेळोवेळी बैठका, पाहणी दौरेही झाले आहेत परंतु रस्त्याची कामे अद्यापपर्यंत सुरु झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्ते पूर्ण करण्यासाठी अनेक वर्षापासून पाठपुरावा सुरु असतांना रस्त्याच्या कामांमध्ये प्रगती होत नसल्याने सदरहू रस्ते पूर्ण करण्याबाबत होत असलेला विलंब लक्षात घेता शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१), (२), (३), व (४)

• प्रस्तुत तीनही रस्ते विकसित करण्याची कार्यवाही विविध टप्प्यांवर सुरु आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• कोथरुड-कर्वेनगर तसेच सिंहगड रस्त्यावरील वाहतूकीची कोंडी सोडविण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत सदर रस्त्याचे सुमारे ५० % काम पुर्ण झाले आहे.

• बालभारती पौंड रस्त्याचे कामाबाबतची कार्यवाही सुरु आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार तज्ञ सल्लागार नेमण्याची कार्यवाही पुर्ण झाली असून ट्रॅफिक इम्पॅक्ट स्टडी ॲन्ड इनवॉर्नमेन्ट इम्पॅक्ट स्टडी करण्यासाठी कार्यादेश देण्याची कार्यवाही सुरु असून, त्याप्रमाणे लवकरच कामास सुरुवात करण्यात येणार आहे.

• सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये पाणंद रस्त्याकरिता रु. ६८.०० लाख तरतुद असून त्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेत धायरी, उत्तमनगर, शिवणे या गावांमधील नागरिक मुलभूत-पायाभूत सोयी-सुविधांपासून वंचित असल्याबाबत**

**(४०) १३१८५२ (०८-१२-२०१८) श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेत धायरी, उत्तमनगर, शिवणे या गावांचा समावेश होऊन दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास एक वर्ष पूर्ण होऊनही या गावांमधील नागरिक पायाभूत-मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या चालू अर्थसंकल्पात या गावांसाठी १०० कोटी रुपयांपेक्षा अधिकचा निधी उपलब्ध असूनही आतापर्यंत त्यापैकी ०८ टक्के निधी देखील खर्च झालेला नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाणीपुरवठा, गटार, बांधकाम, पथ, शिक्षण, विद्युत, घनकचरा अशा विविध विभागांसह क्षेत्रीय कार्यालयांमार्फत या सर्व गावांत विविध स्वरूपाची विकासकामे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या संथ कारभारामुळे प्रलंबित राहिली असून याबाबत पुणे महानगरपालिका प्रशासनाकडे वारंवार बैठका, लेखी पत्रव्यवहार केला असता अद्यापही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त गावांसाठी निधी उपलब्ध असतांना अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे अत्यावश्यक कामे झाली नसल्याने शासनाच्या वतीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१), (२), व (३)
• पुणे शहरालगतच्या ११ गावांचा समावेश दि.०४/१०/२०१८ च्या अधिसूचनेन्वये करण्यात आला आहे.
• या करिता उपलब्ध निधीमधून सदर गावांच्या समाविष्ट क्षेत्रांचे विकास करण्याचे पुणे महानगरपालिकेचे नियोजन असून पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन याबाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
• उरुळी देवाची व फुरसुंगी या गावांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत योजना राबविण्यात येत आहे. सदर योजना संथगतीने सुरु असल्याने या गावांना टँकरमार्फत पाणी पुरवीण्यात येत आहे. अन्य गावांना सुध्दा पाणी पुरवठा करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी महानगरपालिकेत रिक्त पदांचा असलेला अनुशेष**

**(४१) १३१९१२ (१०-१२-२०१८) श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिकेस रिक्त पदांचा अनुशेष मोठया प्रमाणात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेत सहायक आयुक्त, उपसंचालक नगररचना, सहायक संचालक नगररचना व इतर महत्वाची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदांच्या अनुशेषामुळे प्रशासकीय यंत्रणेवर ताण पडत असून यंत्रणा विस्कळीत झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरची रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१९) :** (१) व (२)

- परभणी महानगरपालिकेत सहाय्यक आयुक्तांची ६ पदे मंजूर असून, त्यापैकी एक पद प्रतिनियुक्तीने भरण्यात आलेले आहे. उर्वरित पदे रिक्त आहेत.
- आकृतीबंधानुसार उप संचालक,नगररचना हे पद मंजूर नसून सहाय्यक संचालक नगररचना हे पद रिक्त आहे. ही वस्तुस्थिती आहे.

(३) महानगरपालिकेतील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला आहे.

(४) सहाय्यक आयुक्त व इतर रिक्त पदांवर अधिकारी उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील तक्षशील नगर, कुमठा नाका, मांग गारुडी वस्ती, सेटलमेंट फ्री कॉलनी नं.६ तसेच इतर झोपडपट्टीमधील नागरीकांना रमाई आवास योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(४२) १३१९२४ (१०-१२-२०१८) कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील तक्षशील नगर, कुमठा नाका, मांग गारुडी वस्ती, सेटलमेंट फ्री कॉलनी नं.६ तसेच इतर झोपडपट्टीमधील नागरीकांचे नाव रमाई आवास योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले असूनही सोलापूर महानगरपालिकेची कर पावती नसल्यामुळे सदर नागरीकांना रमाई आवास योजनेचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणच्या गोरगरीबांना रमाई आवास योजनेचा लाभ देण्यात यावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांना दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणच्या नागरीकांना रमाई आवास योजनेचा लाभ मिळण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१९) :** (१), (२) व (३)

- याबाबतचे मा.लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून आले नाही, असे सोलापूर महानगरपालिकेने कळविले आहे.
- सोलापूर शहरातील विविध रस्ते बांधकाम करीत असताना बाधित झालेल्या कुटुंबांना तक्षशील नगर, कुमठा नाका, टीपी ३/२३ येथे ट्रॅन्झीट कॅम्पमध्ये ३० वर्षाच्या कराराने २७५ चौ. फुटाची घरे देण्यात आली आहेत.
- या बाधीत कुटुंबापैकी अधिकृतपणे राहणाऱ्या ५० कुटुंबांना रमाई आवास योजनेचा लाभ दिला आहे.
- या ट्रॅन्झीट कॅम्पमध्ये २२ कुटुंब हे मूळ भोगवटाधारक नसून अनधिकृतपणे राहत आहेत. त्यांच्या स्वत:च्या नावे कर आकारणी पावती नसल्याने त्यांना रमाई आवास योजनेचा लाभ देता आला नाही, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत  नाही.

---

## जुहू (मुंबई) येथील प्रेमनगर झोडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत

**(४३) १३२००२ (०४-१२-२०१८) श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुहू येथील प्रेमनगर झोडपट्टी पुनर्वसन योजनेला झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास पाटील यांनी झुकते माप दिल्याप्रकरणी चौकशी सुरू असतानाच आता प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या निवडणुक अधिका-याने विकासकाला मदत होईल अशी भूमिका घेतल्याची धक्कादायक बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत येथील नागरिकांनी आक्षेप घेतला असून याविरोधात सहनिबंधक यांच्याकडे अपिल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय वा त्यानुसार नागरिकांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०२-२०१९) :** (१) हे खरे नसल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**हिंगणघाट (जि.वर्धा) नगरपालिकेतील रोजंदारी कामगारांना वाढीव दराने वेतन मिळण्याबाबत**

**(४४) १३२५६० (१०-१२-२०१८) श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) नगरपालिकेत सन १९८२ ते १९९७ पर्यंत सेवेत लागलेले २२६ रोजंदारी कामगार असून त्यांना ४३० रुपये रोजप्रमाणे किमान वेतन मिळते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मजुरीत कामगार आयुक्त, मुंबई यांच्या आदेशाप्रमाणे दिनांक १ जानेवारी, २०१७ पासून प्रतिदिन ११८ रुपये वाढ करून ५४८ रुपये प्रतीदिन करण्यात आले आहे मात्र हिंगणघाट नगरपालिकेत वाढीव मजुरीच्या आदेशाला एक वर्ष होऊनही जुन्याच दराने कामगारांना वेतन अदा केले जात असल्याने कर्मचा-यांनी अनेक वेळा नगरपालिका कार्यालयापुढे धरणे आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू वाढीव रोजंदारी अद्यापही न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू कामगारांना तातडीने ५४८ रुपये प्रतीदिन रोजंदारी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१९) :** (१), (२), (३) व (४)
- हिंगणघाट नगरपरिषदेतील रोजंदारी कर्मचाऱ्यांना कामगार आयुक्त, मुंबई यांच्या दिनांक ६/२/२०१८ च्या अधिसूचनेनुसार सुधारित किमान वेतन रुपये ६८३/- प्रतिदिवस प्रमाणे अदा करण्यात येते.
- किमान वेतनाच्या दरात प्रतिमाह रुपये ११८/- एवढी वाढ जानेवारी, २०१७ पासून करण्यात आली आहे. या वाढीव फरकाच्या रक्कमेपैकी प्रति कर्मचाऱ्यास रुपये ३०,०००/- प्रमाणे रक्कम प्रदान झाली आहे.

(५) प्रश्न उद्भवत  नाही.

---

## कोरपना (जि.चंद्रपूर) नगरपंचायतीने पशुसंवर्धन विभागाच्या भुखंडावर नियमबहाय्य निर्लेखित कार्यवाही करुन सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याबाबत

**(४५) १३२६८८ (१०-१२-२०१८) ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना (जि.चंदपूर) नगरपंचायतीने पशुसंवर्धन विभागाच्या भुखंडातील कक्ष, कंपाउन्ड वॉल, तसेच ग्रामसेवक निवास, जुनी ईमारत, समाज मंदीर, कायदेशीर प्रक्रिया पुर्ण न करता नियमबहाय्य निर्लेखित करण्याची कार्यवाही करुन सार्वजनिक मालमत्तेची हानी केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नगरपंचायतीने पशुसंवर्धन विभागाच्या भुखंडातून रस्ता तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळुन आले, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१), (२) (३) व (४)

- नगरपंचायत कोरपना यांनी दिनांक १४/११/२०१७ रोजी ठराव क्रमांक २० अन्वये, नगरपंचायत क्षेत्रातील वार्ड क्र.१२ भावराव कारेकर ते आठवडी बाजारापर्यंत जाणाऱ्या रस्त्यामध्ये असलेले पशुसंवर्धन दवाखान्याचे तार कंपाऊंड काढून रस्ता काढण्यात यावा आणि याबाबतची माहिती संबंधीत कार्यालयाला कळविण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला होता. तथापि, शासकीय मालमत्ता पाडण्यासंदर्भात कोणताही लेखी आदेश नगरपंचायतीकडून देण्यात आला नव्हता.
- यासंदर्भात दिनांक २९/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मुख्याधिकारी, नगरपंचायत कोरपना यांनी पशुवैद्यकीय दवाखान्याची संरक्षण भिंत पाडण्याचे आदेश त्यांनी दिले नसल्याचे तसेच सदर भिंत पाडतेवेळी नगरपंचायतीचा कोणताही कर्मचारी उपस्थित नसल्याचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना कळविले आहे.
- नगरपंचायतीने पशुसंवर्धन विभागाच्या भूखंडातून कोणताही रस्ता तयार करण्यात आलेला नाही, असे मुख्याधिकारी, नगरपंचायत कोरपना यांनी कळविले आहे.
- दरम्यान तार कंपाऊंडच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली असता तेथील तार कंपाऊंड तुटलेले नसल्याचे आढळून आले आहे. तसेच तेथे कोणताही रस्ता अस्तित्वात नसून तार कंपाऊंड असल्याने तेथे कोणतीही रहदारी होत नाही, असेदेखील मुख्याधिकारी, नगरपंचायत यांनी कळविले आहे.
- दरम्यान नगरपंचायत कार्यालयाकडील पत्रव्यवहार तपासला असता त्यामध्ये कार्यालय अधीक्षक यांनी मुख्याधिकारी यांची मान्यता न घेता, त्यांच्या स्तरावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचेकडे पत्रव्यवहार केल्याचे दिसून आल्याने त्यांना मुख्याधिकारी यांनी कारणे दाखवा नोटीस दिली आहे. तसेच याबाबत संबंधीत कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची शिफारस नगरपंचायत कोरपना यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे केली आहे.

---

**जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुस्थान अभियानांतर्गत राजुरा नगरपालिका क्षेत्रात घरांचे सुरु केलेले बांधकाम**

**(४६) १३२७०० (१०-१२-२०१८) अॅड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुस्थान अभियानांतर्गत राजुरा नगरपालिका क्षेत्रात सन २००९ मध्ये ७७ घरांना मंजुरी मिळाली त्यानंतर बांधकाम सुरु केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमानुसार ज्यांची घरे सन २०१३ पुर्वी झाली आहेत त्यांना वाढीव योजनेतील निधीतुन (नियोजनातून) वगळण्यात आले, हे ही खरे आहे आय,

(३) असल्यास, १४७ लाभार्थ्यांना वाढिव अनुदान अजुनपर्यंत नगर प्रशासनाने दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळुन आले, त्या अनुषंगाने कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१९) :** (१) अंशतः खरे आहे.

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत (IHSDP) ही मंजूरी होती व ही मंजूरी ७७७ घरकुलांना होती.

(२), (३) व (४)

- सदर योजनेची धोरण निश्चिती व निधी उपलब्धता शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडून केली जाते. त्या विभागाच्या दिनांक २८/१/२०१४ च्या शासन निर्णयातील अट क्रमांक-२ नुसार, दिनांक ३१/३/२०१३ रोजी जी घरकुले पूर्ण झाली आहेत, त्यांना अतिरिक्त अनुदान अनुज्ञेय नाही. सबब, दिनांक ३१/३/२०१३ च्या आधी बांधून पूर्ण झालेल्या १४७ घरकुल लाभार्थ्यांना वाढीव अनुदान देणे शक्य झालेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील जेववैविध्य उद्यानांच्या आरक्षणावर मोठ्या प्रमाणात होत असलेले बांधकाम**

**(४७) १३२७५७ (१०-१२-२०१८) श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने महानगरपालिकेच्या हद्दीतील टेकड्यांवर व डोंगरमाथ्यावर जेववैविध्य उद्यानांच्या आरक्षणावर (बीडीपी) केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील सिंहगड रस्त्यावरील हिंगणे, दामोदर नगर,गंगाधम, कात्रज , परिसरातील बीडीपी आरक्षित टेकड्या फोडून मोठया प्रमाणवर प्लॉटिंग करून विक्री करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बीडीपी आरक्षित जामिनींवर प्लॉटिंग आणि अनधिकृतपणे बेकायदेशीर बांधकाम सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बेकायदेशीर अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्याबाबत प्रशासन दुर्लक्ष करित असल्याने भूमाफिया सदर प्लॉट व फ्लॅट बेकायदेशीररित्या विक्री करून नागरिकांची फसवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सक्षम यंत्रणा नसल्याने सदर प्लॉटिंग व बांधकामांवर कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, बीडीपी आरक्षित जमिनीवर पुणे शहरातील मोठ्या प्रमाणात होत असलेल्या बांधकामास अटकाव घालण्याकरिता सुसज्ज यंत्रणा व पुरेसा कर्मचारी नियुक्त करण्याबाबत सेच सदर मिळकतीच्या प्लॉट व फ्लॅट च्या नव्याने नोंदी करण्यास प्रतिबंध करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) (३) (४) व (५)

पुणे महानगरपालिकेच्या सिंहगड रस्त्यावरील हिंगणे, दामोदर नगर, गंगाधाम, कात्रज या भागातील टेकड्या फोडून बांधकामे सुरु असलेल्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे पाडण्याची कारवाई करण्यात आली असून काही ठिकाणी संबंधीत पोलीस स्टेशनला पुढील कार्यवाहीसाठी कळविण्यात आले आहे.

(६) बी.डी.पी. आरक्षित जमिनीवर अनाधिकृत बांधकाम होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्यात येते, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेच्या फुरसुंगी येथील कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून खत आणि जळाऊ इंधन तयार करण्याची निविदा प्रक्रिया रद्द करण्याबाबत**

**(४८) १३२८३४ (१०-१२-२०१८) श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या फुरसुंगी येथील कचऱ्यावर प्रक्रिया करून त्या पासून खत आणि जळाऊ इंधन तयार करण्यासाठी १००० टन क्षमतेच्या हंजर कंपनीला काम देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ३ वर्षांपासून सदर प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालत नसल्याने कचरा डेपो लगत आजमितीला सुमारे ९ लाख टन कचरा जमा झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कचऱ्याचे बायोमाईनींग पद्धतीने विल्हेवाट लावण्याकरिता ९० कोटींची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निविदेमधील अटी व शर्तीमध्ये बायोमाईनींग च्या कामाचे अनुभवाचा पात्रता करता समावेश केला नसल्याने काही विशिष्ट कंपन्यांना काम देण्याच्या हेतूने प्रशासन व कंपनीच्या अधिकाऱ्यांनी आर्थिक संगनमताने निविदा प्रक्रिया राबविली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करून सदर निविदा रद्द करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५)

• उरूळी-फुरसुंगी कचरा डेपो येथील मोठ्या प्रमाणावर जमा होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी मा.राष्ट्रीय हरीत लवाद न्यायालयाने बायोमायनिंग प्रक्रीया करणेबाबत आदेश दिले होते.

• त्यास अनुसरून बी-२ पध्दतीने दि.२६.०७.२०१८ रोजी जाहिरात देऊन निविदा प्रक्रीया राबविणेत आली.

• या निविदेत प्रत्यक्ष ३ ठेकेदारांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी फक्त सेव्ह एनव्हायर्नमेंट या संस्थेकडे बायोमायनिंगचा अनुभव होता.

• मे.भूमी ग्रीन या संस्थेकडे बायोमायनिंगचा अनुभव नव्हता तथापि निविदेतील अटीनुसार १,०८,८२२ मे.टन इतका घनकचरा हाताळणी (प्रक्रीया) केली असल्याबाबतचा अनुभव असल्याने तसेच या प्रकल्पाकरीता सदर कंपनीकडून सर्वात कमी दर म्हणजेच रू.६४६/- प्रति मे.टन या दराने रू.५८,१४,००,०००/- इतकी टेंडर रक्कम प्राप्त झाल्याने सदर कंपनीची शिफारस केली असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• मे.भूमी ग्रीन एनर्जी यांना कामाचे कार्यादेश दिनांक १/११/२०१८ रोजी देण्यात आलेले आहेत.

• उपरोक्त वस्तुस्थिती व पुणे महानगरपालिकेचा अहवाल तपासला असता बायोमायनिंगच्या कामाचा अनुभव नसलेल्या संस्थेस सदरच्या कामाचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

• बायोमायनिंगच्या कामाचा अनुभव नसलेल्या कंपनीस सदर कामाचे कार्यादेश का देण्यात आले याबाबत खुलासा सादर करण्याचे आदेश आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना देण्यात आलेले आहेत. सदर खुलासा प्राप्त झाल्यानंतर याप्रकरणी पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे प्रायोजन आहे.

• बायोमायनिंग कामाची व्याप्ती विचारात घेऊन जुना कचरा साठविलेल्या जागेपैकी किमान ९० टक्के जागा पुनर्प्राप्त करून घेण्याची जबाबदारी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील असे धोरण दि.१३.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरखेड नगरपरिषदेमधील राज्य संवर्गाची रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत**

**(४९) १३३५२३ (०५-१२-२०१८) श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड नगरपरिषद मधील राज्य संवर्गाची रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ८ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास नगरविकास राज्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार सदरची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) • उमरखेड नगरपरिषदेचा सुधारीत आकृतीबंध दिनांक १२/२/२०१८ रोजी मंजूर झाला आहे. त्यानुसार नगरपरिषदेत राज्य संवर्गाची एकूण २६ पदे मंजूर आहेत.

• राज्य संवर्गाची पदभरती प्रक्रिया आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांच्याकडून करण्यात आली असून उमरखेड नगरपरिषदेकरीता ५ पदे नुकतीच उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगीर (जि.लातूर) नगरपरिषदेची हद्दवाढ करण्याबाबत**

**(५०) १३४०११ (१०-१२-२०१८). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) नगरपरिषदेची स्थापना सन १९५३ मध्ये होवून त्यानंतर ६५ वर्षाच्या कालखंडानंतरही या शहराची अद्याप हद्दवाढ झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहराची सन २०११ च्या जनगणनेनुसार १०३५५० इतकी लोकसंख्या असून शहराचे क्षेत्र ६७२ एवढेच असून उदगीर शहराची सुधारीत विकास योजना माहे, एप्रिल २०१२ मध्ये वा त्या दरम्यान मंजुर केलेली असणे तसेच सध्याची राहिवास वापराची घनता ६१३ व्यक्ती प्रति हेक्टर असणे व सर्वसाधारणपणे शहराची हेक्टर क्षमता २५० व्यक्ती प्रति होण्यासाठी उदगीर नगरपरिषदेची हद्दवाढ करण्यासाठी माहे ऑगस्ट, १९८३ अन्वये नगरपरिषदेची हद्दवाढ करताना संपुर्ण महसुली गावे समाविष्ठ करण्याचे निर्देश असुनही उदगीर शहराचे महसुली गावातील सर्वेमधील गावांचा समावेश करूनही अद्याप शहराची हद्दवाढ झाली नसल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान उदगीर शहराची हद्दवाढ करण्यात यावी यासाठी शासनाकडे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उदगीर शहराची हद्दवाढ करण्यासाठीच्या निर्देशाचे शासनाचे आदेश संबंधित प्रशासनाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे वेळोवेळी नगरपरिषदेने प्रस्ताव सादर करूनही जिल्हाधिकारी कार्यालयाने शासनाकडे कुठलाच प्रस्ताव पाठविण्यात आला नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०१-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) जिल्हाधिकारी, लातूर यांनी दि.२०.०७.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, उदगीर नगरपरिषदेच्या हद्दवाढीमुळे लोकसंख्येत ९% एवढी वाढ होत असताना १०९% इतक्या प्रमाणात हद्दवाढ प्रस्तावित केली असल्याने, प्रथम टप्प्यात संयुक्तिक हद्दवाढ प्रस्तावित करुन फेरप्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, लातूर यांना कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.